अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील मान्यवर व्यक्तींचे स्मारक बांधणे तसेच सांस्कृतिक व ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाच्या असलेल्या स्थळांचा विकास करणे या योजनेअंतर्गत सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे येथील पाली विभागाच्या स्वतंत्र इमारत बांधकामासाठी निधी मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः सान्यावि -२०१६/प्र.क्र. ३४४/बांधकामे
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: २८ फेब्रुवारी,२०१९.

वाचा :-

१) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-२०१४/ प्र.क्र.६१/ बांधकामे, दि.१६/१२/२०१५.

२) शासन शुध्दीपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-२०१४/ प्र.क्र.६१/ बांधकामे, दि.५/३/२०१८.

३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन पत्र, क्र. बैठक-२०१८/प्र.क्र.७१/ बांधकामे, दि.१४/११/२०१८ च्या पत्रासोबतचे दि.१०/१०/२०१८ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त .

४) आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांचे पत्र जा. क्र. सकआ/शिक्षण/पाली विभाग/इमा.बांधकाम/सावि.फुले, विद्यापीठ,पुणे/१८-१९/४४८०, दि. १६/१२/२०१८.

प्रस्तावना:-

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील मान्यवर व्यक्तींची स्मारक बांधणे तसेच सांस्कृतिक व ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाच्या स्थळांचा विकास करण्याच्या दृष्टीने स्वयंसेवी संस्थांना अनुदान मंजूर करण्याविषयीचे निकष, मार्गदर्शक तत्वांना संदर्भ क्र. १ व २ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. संदर्भ क्र. १ व २ येथील शासन निर्णयात नमूद करण्यात आलेल्या विहित कार्यपध्दती नुसार संदर्भ क्र.४ येथील पत्रान्वये, आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांनी सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे येथील पाली विभागाच्या स्वतंत्र इमारत बांधकामाचा रू.१४,९६,२०,९००/- (अक्षरी रूपये चौदा कोटी शहान्नव लक्ष वीस हजार नऊशे फक्त) इतक्या खर्चाचा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनास सादर केला आहे. मा.मंत्री, (सा.न्या.व वि.स.) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीच्या दि.१०/१०/२०१८ रोजी झालेल्या बैठकीत सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आली असून सदर प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तांत्रिक छाननी व सहमतीसाठी पाठविला असता सार्वजनिक बांधकाम विभागाने रू.१३,३४,७५,२१०/- (अक्षरी रूपये तेरा कोटी चौतिस लक्ष पंच्याहत्तर हजार दोनशे दहा फक्त) इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यास सहमती दर्शविली आहे. त्यानुषंगाने सदरील बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे येथील पाली विभागाच्या स्वतंत्र इमारत बांधकाम करणे या कामाचा रू.१४,९६,२०,९००/- (अक्षरी रूपये चौदा कोटी शहान्नव लक्ष वीस हजार नऊशे फक्त) इतक्या रकमेचे अंदाजपत्रकास सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सादर केले होते. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने परिगणित केलेल्या सुधारित रू.१३,३४,७५,२१०/- (अक्षरी रूपये तेरा कोटी चौतिस लक्ष पंच्याहत्तर हजार दोनशे दहा फक्त) इतक्या रकमेस खालील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. एकूण अंदाजपत्रकीय खर्चामध्ये शासनाचा हिस्सा ९० टक्के (रू.१२,०१,२७,६८९/- अक्षरी रूपये बारा कोटी एक लक्ष सत्तावीस हजार सहाशे एकोणनव्वद फक्त) इतका राहील व सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे यांचा हिस्सा १० टक्के (रू.१,३३,४७,५२१/- (अक्षरी रूपये एक कोटी तेहत्तीस लक्ष सत्तेचाळीस हजार पाचशे एकवीस फक्त) इतका राहील.

अ) सामाजिक न्याय विभागाच्या निधीतून बांधण्यात येणाऱ्या इमारतींवर सामाजिक न्याय विभागाची मालकी राहील याबाबतचा करारनामा आयुक्त, समाजकल्याण,पुणे यांनी सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे यांच्यासोबत करावा.

आ) काम सुरू करण्यापूर्वी नमुना नकाशा, मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास वास्तुविशारदांकडून मंजूरी घेऊनच सुरू करावे.

ब) ढोबळ स्वरूपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करून काम हाती घ्यावे.

क) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र. इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/तां.क.१, दि. १० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

ड) सदर कामाच्या बांधकामाचा खर्च विभागाने त्यांचेकडील उपलब्ध नियतव्ययामधून करण्यात यावा.

इ) सार्वजनिक बांधकाम विभगाच्या शासन निर्णय क्र.बीडीजी २०१७/ प्र.क्र.६०/इमारती- २, दि. ७/७/२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

ई) नियोजित जागा उपभोक्ता विभागाच्या ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करून सदर कामाच्या निविदा सूचना प्रसिध्द करण्यात याव्यात.

उ) प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यापूर्वी अंदाजपत्रकावर अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,पुणे व विभागाचे वतीने प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, पुणे यांनी साक्षांकन करणे आवश्यक आहे.

ऊ) सदर वास्तू सामाजिक न्याय विभागाच्या अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील मान्यवर व्यक्तींची
स्मारक बांधणे तसेच सांस्कृतिक व ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाच्या स्थळांचा विकास करण्याच्या दृष्टीने स्वयंसेवी संस्थांना अनुदान या योजनेतून बांधण्यात आली आहे. त्याबाबतचा स्वयंस्पष्ट फलक इमारतीच्या दर्शनी भागावर लावणे बंधनकारक राहील.

२. सार्वजनिक बांधकाम विभागाने छाननीअंती Recapitulation Sheet प्रमाणे प्रस्तावित करण्यात आलेल्या रू.१३,३४,७५,२१०/- (अक्षरी रूपये तेरा कोटी चौतिस लक्ष पंच्याहत्तर हजार

दोनशे दहा फक्त) इतकी रक्कम परिगणीत करण्यात आली असून Recapitulation Sheet पुढीलप्रमाणे आहे.

Name of the Department : SOCIAL JUSTICE DEPTT.			
Name of Work : Construction of New Building Pali Language Department at Savitribai Phule Pune University, Pune			
RECAPITULATION SHEET			
Sr. No.	**Particulars of Items**	**Norms (Unit Rate Rs. per Sqmt./Meter/LumpSum etc.)**	**Cost Rs.**
(A)	ESSENTIAL ITEMS		
1	**Building Proper (Scope)**		
	1917.052 sq.mt	18599.08	7,62,15,320
	(d) Cost of Construction		**7,62,15,320**
2	**Electrification** Internal	5% of 1 (d)	38,10,766
	External	6% of 1 (d)	45,72,919
		Total	**83,83,685**
3	**Water Supply and Sanitation**	5% - of 1 (d)	**38,10,766**
4	**Miscellaneous Items**		
	Green Building 5%	-	**38,10,766**
	Internal Roads /Compound wall	as per abstract	20,00,000
	Furniture	3000 Sqm	1,22,93,400
	Rain Water Harvesting and plantation	Lump sum	10,00,000
	Fire Fighting Arrangement	Lump sum	10,00,000
		Total	**2,01,04,166**
	Sub Total (A) = (1)+ (2)+ (3)+ (4)		**10,85,13,937**
(B)	**OPTIONAL ITEMS**		
Sr.	**Items**		
	Water Main, Storage, Pump House,	Lump sum	6,00,000
	Architectural Services	3%	32,55,418
	subtotal (B)		**38,55,418**
	PROJECT (A) + (B) (T)		**11,23,69,355**
	Add 4% for Contingencies on (d)		**30,48,613**
	Add 12% for GST on (T)		**1,34,84,323**
	Add 5% for price Escalation on (T)		**38,10,766**
	Add 1% for insurance on (T)		**7,62,153**
	TOTAL COST OF PROJECT		**13,34,75,210**
	Say Rs. Lakhs		**13,35.00**

३. संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयात नमूद मार्गदर्शक तत्वांचे पालन करुन सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे येथील पाली विभागाच्या स्वतंत्र इमारत बांधकाम या कामावर संनियंत्रण ठेवण्याची जबाबदारी सदर शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय समितीची राहील. वर नमूद सर्व अटी सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे विद्यापीठाला मान्य

असल्याबाबत करारपत्र करुन घ्यावे. शासनाच्या वतीने करारपत्रावर सही करण्यासाठी प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांनी सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे येथील पाली विभागाच्या स्वतंत्र इमारत बांधकामाचा सद्य:स्थितीचा त्रैमासिक अहवाल आणि वितरीत केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास व आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांना वेळीच सादर करण्याची दक्षता घ्यावी.

४. सदर बांधकामावरील खर्च हा मागणी क्र.एन-३, २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीय व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, ०१- अनुसूचित जातीचे कल्याण, ८००-इतर खर्च, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना (०५), स्वयंसेवी संस्थांना सहाय्यक अनुदाने (०५)(०२), स्वयंसेवी संस्थांना सहाय्यक अनुदाने (वि.घ.यो.) (२२२५ ३६३६), ३१ - सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) (योजनातर्गत-दत्तमत्त) या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ या वर्षात मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा.

५. सदर योजनेअंतर्गत आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक, आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच योजनेअंतर्गत मंजूर निधीचे वितरण हे संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयातील परिच्छेद २ (२) मध्ये नमूद अटीच्या अधीन काटेकोरपणे करण्याची जबाबदारी आयुक्त, समजाकल्याण, पुणे यांची राहील.

६. प्रस्तुतचा शासन निर्णय, वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उपविभाग-पाच, अनु.क्र.१ महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीकेतील परि.क्र.१३४ खाली प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१९०२२८१६०५५७०१२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9004dcdaa635070d60922aaa5dec8888d343a4735 6798e6c9cf27e4353d60e51, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2019.02.28 16:10:01 +05'30'

(अनिल कों.आहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, समाजकल्याण, पुणे.
२) कुलसचिव, सावित्रीबाई फुले विद्यापीठ,पुणे
३) उपसचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारती-२), मंत्रालय, मुंबई-३२.
४) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे.
५) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे.

६) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे.

७) महालेखापाल महाराष्ट्र १/२ (लेखापरीक्षा/लेखाअनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.

८) प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, पुणे.

९) सहायक आयुक्त, समाजकल्याण, पुणे.

१०) जिल्हाकोषागार अधिकारी, पूणे.

११) निवडनस्ती (बांधकामे)